Prabhat Kids™

# प्रभातायण

एक कौटुंबिक स्नेहसंवाद

Vector Academy
The Direction of Learning...

FOR INTERNAL CIRCULATION ONLY

14 OCTOBER 2024

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान

# प्रभात किड्स स्कूलला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान






## पुरस्काराची रक्कम 'वाचन प्रभात' ला

अकोला येथील प्रभात किड्स स्कूल ला मिळालेली ही ५१ लाख रुपयांची पारितोषिकाची रक्कम "वाचन प्रभात" साठी देणगी म्हणून दिली जाणार आहे. शासनाकडून मिळालेली ही पारितोषिकाची रक्कम प्रभात किड्स चा सामाजिक उपक्रम "वाचन प्रभात" साठी उपयोगात आणणार असल्याचे 'प्रभात' चे संचालक डॉ. गजानन नारे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याच्या दृष्टीने प्रभात गेल्या अनेक वर्षांपासून 'वाचन प्रभात' हा उपक्रम राबवित आहे. शासनाच्या महावाचन अभियानाला पूरक ठरणारा प्रभातचा हा उपक्रम असून डॉ. नारे यांनी घेतलेल्या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

प्रभात किड्स आणि विशाल हिमालय फाउंडेशनचा उपक्रम

"वाचन प्रभात"

चला काही वाचू या...

मोफत फिरते शालेय वाचनालय

**अकोला ✍ प्रतिनिधी**

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा-2' अंतर्गत नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये शासनाच्या सर्व निकषांची यशस्वी पूर्तता करणा-या येथील प्रभात किड्स स्कूलने 51 लाखाचे पारितोषिक प्राप्त करुन प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या अभियानाचा गौरव पुरस्कार प्रदान समारंभ दि. 14 ऑक्टोबर रोजी मुंबई येथे शानदार शासकीय कार्यक्रम नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस, नरिमन पॉईंटच्या भव्य सभागृहात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी प्रभात किड्स स्कूलला हा बहुमान मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व शालेय शिक्षण मंत्री ना. दीपक केसरकर यांच्या शुभहस्ते शाळेचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे यांनी स्विकारला. त्यावेळी इंजि. अरविंद देठे, रेखा देठे, ॲड.वल्लभ नारे, प्राचार्या वृषाली वाघमारे, उपप्राचार्या अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजित जोशी, सिनिअर को-ऑर्डीनेटर, मो. आसिफ, सीबीएसई को-ऑर्डीनेटर प्रशांत होळकर, आकाश हरणे, अकोला जि.प. च्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर, प्राचार्या श्रीमती रत्नमाला खडके प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार, गटशिक्षणाधिकारी श्याम राऊत, केंद्र प्रमुख गोपाल सुरे हे यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए. कुंदन, शिक्षण आयुक्त डॉ. सुरज मांढरे, शिक्षण संचालक (योजना) डॉ. महेश पालकर, अमरावती विभागाचे उपसंचालक शिवलिंग पटवे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

## जपतेय सामाजिक बांधिलकी

स्वच्छता मॉनिटर, नवभारत साक्षरता, 'पाणी अडवा, पाणी जिरवा' व्यवस्थापन, निसर्गरम्यता, तंबाखूमुक्त शालेय परिसर, मतदार जनजागृती, प्रत्यक्ष मतदानाव्दारे शालेय विद्यार्थी मंत्रिमंडळाची निवड, आग व भूकंप परिस्थितीत तयार राहण्यासाठी मॉक ड्रील, इत्यादी सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महावाचन, 'वाचन प्रभात', वक्तृत्व स्पर्धा, सुलेखन स्पर्धा, आनंददायी शनिवार, हॅप्पी स्ट्रीट, ब्रेन डेव्हलपमेंट झोन, क्रीडा, नाट्य व लोक संस्कृती जतनासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन तसेच कृतियुक्त दर्जेदार शिक्षण 'प्रभात' मध्ये दिले जात आहे.




प्रभात किड्स स्कूल ला राज्यात मिळालेला हा सन्मान अकोला शिक्षण विभागाचा सन्मान आहे, असे मी मानते. शिक्षण विभागाच्या सर्वच घटकांनी केलेले योग्य मार्गदर्शन आणि प्रभात किड्स स्कूलच्या सर्व टीमची अथक मेहनत यामुळे राज्यात हा नावलौकिक मिळू शकला. मी शिक्षण क्षेत्रातल्या सर्वांचेच मनापासून अभिनंदन करते.

**डॉ. सुचिता पाटेकर,** शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) अकोला